# डॉ.एच.एन.सिन्हा महाविद्यालय, पातुर
## २०२०-२१
## मराठी विभाग
## वर्ग B.A.(III) (मराठी)

**मृदगंध- भाग-३**

प्रकाशक
राघव पब्लिकशर्स अँन्ड डीस्ट्रीब्युटर्स
राजविलास टॉकिज जवळ
महाल नागपूर-३२
शाखा – जबलपूर
ISBN : ९७८-९३-८३१३२-८२-९

अध्यक्ष- प्राचार्य- डॉ. गजानन जाधव आणि संपादक मंडळ.

## संत तुकाराम (१५९८-१६५०)

**परिचय – संत तुकाराम हे वारकरी संप्रदायातील कळस मानले जातात तुकोबांची अभंगवाणी आजही जनसामान्याच्या अंतकरणात घर करून आहे. त्याचे लौकिक आणि परकौकिक भावजीवन. त्यांच्या अभंगवाणीतून उत्कटपणे आविष्कृत झाले आहे. रात्रंदिन उद्धाचा प्रसंग करून ‘अनंता’ ची प्राप्ती करून घेणारे संत म्हणून त्यांची ओळख आहे. सार्या समाजाला नीतीमूल्यांची आठवण करून देणे हे तुकोबांनी आपले कर्तव्य मानले.**

**संत प्रवृत्तीची विशुद्ध लक्षणे संत तुकारामांनी प्रस्तुत अभंगातून विषद केली आहे.**

जे का रंजके गांजले । त्यासी म्हणेजो आपुले ॥ १ ॥

तोची साधू ओळखावा । देव तेथेंची जाणावा ॥ २ ॥

मुद्रू सबाह्य नवनीत । तैसे सज्जनांचे चित्त ॥ ३ ॥

ज्यासी आपंगिता नाही । त्यासी घरी जो हृदयी ॥ ४ ॥

द्या करणे जे पुत्रासी ॥ तेची दासा आणि दासी ॥ ५ ॥

तुका म्हणे सांगू किती । तोची भगवंताची मूर्ती ॥ ६ ॥

संत तुकारामांचा ‘ जे का रंजले गांजले ‘ हा अभंग म्हणजे संतांची खरीखुरी व्याख्या होय. संत प्रवृत्तीची विशुद्ध लक्षणे या अभंगातून तुकारामांनी विशद केली आहेत.

अर्थ- संत तुकाराम महाराज म्हणतात कि जे रंजले, गाजले आहेत, दिन दुबळे आहेत. त्यांना जो आपले मानतो त्यांना जवळ करतो पोटाशी घेतो तोच खरा साधू होय. अशा साधूच्या ठिकाणी देवत्व असते.

लोणी अंतर्बाह्य जसे मउ असते तसे सज्जन माणसाचे अंतकरण असते दुखीताचे दुःख पाहून त्याचे चित्त विरघळत असते. ज्यांचा कोणी रक्षणकर्ता नाही जो अनाथ आहे. त्याला जो हृदयाशी धरतो जवळ करतो तो खरा साधू होय आणि त्या साधूच्या ठिकाणी देवत्वाचे गुण असतात.

जी व्यक्ती आपल्या पुत्रावर जेवढे प्रेम करते तेवढेच प्रेम तो दास आणि दासीच्या मुलावरही करतो तोच खरा साधू होय. सज्जन होय, तुकराम महाराज म्हणतात कि अशा साधू सज्जनांचे वर्णन किती करू हे संत सज्जन खऱ्या अर्थाने भगवंताची मूर्तीचे आहेत.

# ॥ धन्यवाद ॥

प्रा. सारिका पाचराऊत
मराठी विभाग
डॉ.एच.एन.सिन्हा महाविद्यालय, पातुर